भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०६/२०१७

**१) दारु पिण्याच्या वादावरुन संगनमताने धारदार शस्त्राने गळा कापुन जिवानीशी ठार केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०६/२०१७ चे २१.१५ वा. दरम्यान यातील मृतक हितेश उर्फ राजा मोहनलाल इसरानी वय ३५ वर्ष, रा. ढिवर मोहल्ला भंडारा हा व आरोपी याच्यात दारु पिण्याच्या वादावरुन आरोपी क्र. १ व त्याचे मित्र आरोपी क्र. २ ते ४ यांनी संगनमताने मृतक याचा धारदार शस्त्राने गळा कापुन जिवानीशी ठार केल्याने फिर्यादी क्रिष्णा महादेव नान्हे वय ३५ वर्ष, रा. जमनलाल बजाज वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०२,१४७,१४८,१४९ भांदवि. सहकलम ४,२५ भा. ह. का. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) तरुणीच्या मोबाईलचे वॉटस्अपवर अश्लिल मॅसेज पाठविल्याने मानसिक त्रास व मनात लज्जा निर्माण करुन तिचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०५/२०१७ ते ०७/०६/२०१७ चे ०९.४५ वा. दरम्यान यातील आरोपीने त्याचे मोबाईल चे वॉटस्अप वर इंग्रजी मध्ये अश्लिल मॅसेज पाठविल्याने फिर्यादीस मानसिक त्रास व मनात लज्जा निर्माण झाल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ३५४(अ)(१)(४) भांदवी. सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधि २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कंकाळे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अल्पवयीन मुलीचा घरामध्ये आत प्रवेश करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०६/२०१७ ते ०९.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही एकटीच घरी असल्याचे पाहुन तिचे घरामध्ये आत प्रवेश करुन तुझे आई वडील कुठे आहेत असे म्हणुन हात पकडुन तिला समोर बसविले व तिचे खांदयावर हात ठेवुन आरोपी क्र. १ ने तिचा विनयभंग केला. मुलगी ही भिन्न जातीजमातीची आहे हे माहित असुन ती अल्पवयीन असल्याचे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम ३५४(अ) ४५२,३४ भांदवी. सहकलम ८,१२, बाललैगिंक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ सहकलम ३(१)(फ)(१)अजाजअप्रका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. ढोबळे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ०६/०६/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी देविदास भागवत तिवाडे वय २६ वर्ष, राजेन्द्र वार्ड शुक्रवारी भंडारा याने आपली मोटार हिरो होंडा स्पेल्डर प्लस मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ ई ०९३६ किंमती १०,०००/—रु. ही किसनलाल सभागृहा जवळ आला मोटार सायकल दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन ढकलढुकल केली व जिवाने मारण्याची धमकी देवुन ग्रा. प. ला ताला लावुन कायदेयाीर मार्ग बंद केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे ११.३० वा. ते ०७/०६/२०१७ चे १४.०० दरम्यान यातील आरोपी क्र. २ व ४ हे ग्रा. पं. चे सदस्य असुन आरोपी क्र. १ हा पोलीस पाटील आहे व आरोपी क्र. ३ ही आरोपी क्र. २ ची पत्नी आहे यातील आरोपीतांनी सामुहीक इरादा करुन फिर्यादी ही सरपंच असुन तिला सार्वजनीक ठिकाणी फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन ढकलढुकल करुन जिवानिशी मारण्याची धमकी देवुन ग्रा. प.ला ताला लावुन कायदेशीर मार्ग बंद केल्याने फिर्यादी सौ. दिपा रोपेश डोंगरे वय २८ वर्ष, रा. गोसे. बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. अडयाळ येथे कलम ३४१,२९४,५०९,५०४,५०६,३२३,३४ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिऱ्हेपुंजे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) पंजाब नॅशनल बॅंके मध्ये खाता असुन मोबाईवर फोन करुन कार्ड रिनीव्हल करायचा आहे असे सांगुन त्याच्या अकाऊट मधुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे ११.३२ ते १८.३५ वा. दरम्यान यातील फिर्यादीचा बॅंक खाता पंजाब नॅशनल बॅंक भंडारा येथे असुन फिर्यादीचे मोबाईवर कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचा मोबाईल क्र. ने मी पंजाब नॅशनल बॅंक मुंबई वरुन बोलतो तुमचा एटीएम कार्ड रिनीव्हल करायचा आहे असे बोलुन फिर्यादीचा एटीएम कार्ड विचारुन टप्पा टप्याने फिर्यादीचे बॅंक अकाऊट मधुन ३९,०००/–रु. ऑनलाईन काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६(सी)(डी) आय. टी. अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. काळबांधे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**७) अवैध देशी दारु /जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, वरठी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, लाखांदुर व पवनी येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३१३ लिटर हातभट्टी दारु+ १ मोटार सायकल + ४२० किलो सडवा+ साहित्य किंमती ८७,३००/–रु व २४ लिटर २१० मिली लीटर देशी/ विदेशी/ बिअर+ १ मोटार सायकल किंमती १५,४७३/–रु. तसेच जुगारातुन किंमती ७,६५६/–रु. असा एकुण किंमती १,१०,४२९/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.